# जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालय
## शाखा-अन्नधान्य वितरण कार्यालय, सोलापूर
दूरध्वनी व फॅक्स क्र. ०२१७- २७३१००८

क्र.अधावि/कार्या-२७/गोदाम-४/आरआर/ 536 /२०१४ दि.०३/१२/२०१४

विषय :-राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम-२०१३, अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी योजनेकरिता माहे डिसेंबर-२०१४ चे अन्नधान्य वाटप नियतन मंजुर करणेबाबत.

**नियतन वाटप आदेश**

ज्याअर्थी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम-२०१३ केंद्र शासनाने दिनांक ०५ जुलै २०१३ पासुन केला आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.असुका-२०१३/प्र.क्र३३९/नापु-२२, दि.१७ डिसेंबर, २०१३ अन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच दिनांक ०९.०१.२०१४ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करणेबाबत निर्देशित केले आहे. अंत्योदय अन्न योजनेखाली सर्व कुटुंबाना प्रचलित निकषाप्रमाणे प्रतिमाह ३५ किलो धान्याचे वाटप व इतर पात्र प्राधान्य कुटुंबातील प्रतिव्यक्तींना ५ किलो प्रतिमाह (३ किलो गहु व २ किलो तांदुळ) याप्रमाणे धान्य देय आहे.

त्याअर्थी, मी अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर परिमंडळ अधिकारी अ,ब,क, ड विभाग सोलापूर यांनी सादर केलेल्या शिधापत्रिका व लाभार्थीसंख्येच्या माहितीनुसार परिमाणानुसार लागणारा कोटा लक्षात घेऊन योजनानिहाय,परिमंडळनिहाय अन्नधान्याची नियतन खालीलप्रमाणे वाटप करीत आहे.

- **अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना आवश्यक अन्नधान्यः-**

**(आकडे क्विंटलमध्ये)**

| अ.क्र | परिमंडळ | कार्डसंख्या | लोकसंख्या | प्रतिमाह ३५ किलो प्रमाणे आवश्यक धान्य (२० किलो गहु १५ किलो तांदुळ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गहु | तांदुळ | एकुण |
| १ | अ | १०६३ | ४०९६ | २१२.६० | १५९.४५ | ३७२.०५ |
| २ | ब | १५४० | ५०४८ | ३०८.०० | २३१.०० | ५३९.०० |
| ३ | क | २४३१ | ८९४९ | ४८६.२० | ३६४.६५ | ८५०.८५ |
| ४ | ड | २१०६ | ७३२३ | ४२१.२० | ३१५.९० | ७३७.१० |
| **एकुण** | | **७१४०** | **२५४१६** | **१४२८.००** | **१०७१.००** | **२४९९.००** |

- **प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना आवश्यक अन्नधान्यः-**

**(आकडे क्विंटलमध्ये)**

| अ.क्र | परिमंडळ | कार्डसंख्या | लोकसंख्या | प्रतिव्यक्ती ५ किलो प्रमाणे आवश्यक धान्य (३ किलो गहु २ किलो तांदुळ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गहु | तांदुळ | एकुण |
| १ | अ | १२३४३ | ६३५६० | १९०६.८० | १२७१.२० | ३१७८.०० |
| २ | ब | ११८८१ | ६१३२४ | १८३९.७२ | १२२६.४८ | ३०६६.२० |
| ३ | क | ३३४६८ | १७५०५७ | ५२५२.०१ | ३५०१.३४ | ८७५३.३५ |
| ४ | ड | २२७७० | १२३३५६ | ३७००.६८ | २४६७.१२ | ६१६७.८० |
| **एकुण** | | **८०४६२** | **४२३३०७** | **१२६९९.२१** | **८४६६.१४** | **२११६५.३५** |

परिमंडळ अधिकारी यांनी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या अनुषंगाने दिलेल्या सुचनांनुसार धान्य वाटप आदेशानुसार नियमानुसार परमिट तात्काळ सोडावे. तसेच कार्डधारकांना धान्य मिळाले नाही, अशी कोणत्याही स्वरुपाची तक्रार येणार नाही यांची दक्षता घ्यावी. रास्त भाव धान्य दुकानदार हे परमिटप्रमाणे गोदामातून उचल केलेले धान्य वाहतुक करुन पात्र शिधापत्रिकेवर धान्याचे वितरण करतात किंवा कसे याची खात्री करावी. जेणेकरुन योजनानिहाय वितरीत होणा-या धान्याचा गैरवापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**अन्नधान्य वितरण अधिकारी**
**सोलापूर**

प्रति,

परिमंडळ अधिकारी, अ,ब,क,ड विभाग, सोलापूर

प्रत:-१.गोदाम पर्यवेक्षक, रामवाडी गोदाम, सोलापूर शहर, २. श्री एस.जी.बनसोडे, वाहतुक प्रतिनिधी.

२/- यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**अन्नधान्य वितरण अधिकारी**
**सोलापूर**